उन्हाळी हंगामातील धान खरेदीचे उद्दिष्ट वाढविण्याचा राज्य शासनाचा निर्णय.

माजी अर्थमंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराचे फलीत.

१५ जुलै पर्यंत धान खरेदी करण्याचे अभिकर्ता संस्थांना शासनाचे निर्देश.

माजी अर्थमंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने उन्हाळी हंगामातील धान खरेदीचे उद्दिष्ट वाढविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. शासनाच्या अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या सहसचिव श्रीमती चारूशिला तांबेकर यांनी दिनांक ३ जुलै २०२२ रोजी महाराष्ट्र राज्य को-ऑपरेटीव्ह मार्केटींग फेडरेशन मुंबई तसेच व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्यादीत नाशिक यांना निर्देश दिले आहे.

उन्हाळी हंगामातील धान खरेदीची उद्दिष्ट त्वरीत वाढवावे आणि धान उत्पादक शेतक-यांना दिल्यासा द्यावा या मागणीसाठी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी सातत्याने शासनाशी पत्रव्यवहार व पाठपुरावा केला आहे. माजी अन्न, नागरी, पुरवठा मंत्री छगन भुजबळ तसेच अन्न, नागरी पुरवठा विभागाचे सचिव विजय वाघमारे यांच्या भेटी घेत आ. मुनगंटीवार यांनी हा मुद्दा रेटला. मात्र आश्वासन देवूनही कार्यवाहीचा अभाव होता. दिनांक २ जुलै २०२२ रोजी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत या मागणीचे निवेदन सादर केले. यावेळी झालेल्या चर्चेअंती २ दिवसात याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात येईल, असे आश्वासन उपमुख्यमंत्र्यांनी दिले होते. सदर आश्वासनाची पुर्तता झालेली असून दिनांक ३ जुलै रोजी याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले.

पणन हंगाम २०२१-२२ (रब्बी) मध्ये केंद्र शासनाने १.८५ एलएमटी धान खरेदीस दिलेल्या मंजूरीच्या अनुषंगाने मार्केटींग फेडरेशन यांना १.३४ एलएमटी आणि आदिवासी विकास महामंडळ यांना ०.५१ एलएमटी इतके धान खरेदीची उद्दिष्ट नेमून देण्यात आले होते. हे उद्दिष्ट दोन्ही अभिकर्ता संस्थांनी पूर्ण केले आहे. केंद्र शासनाच्या दिनांक २ जुलै २०२२ च्या पत्रान्वये ३.०२४ एलएमटी धान खरेदीस मान्यता दिली आहे. या मंजूर उद्दिष्टापैकी उक्त हंगामासाठी यापूर्वी दिलेले १.८५ एलएमटी धान खरेदीचे उद्दिष्ट वगळता उर्वरित १.१७४ एलएमटी पैकी मार्केटींग फेडरेशन यांना ०.८२ एलएमटी आणि आदिवासी विकास महामंडळ यांना ०.३५ एलएमटी इतके धान खरेदीचे उद्दिष्ट नेमून देण्यात आले आहे.

अभिकर्ता संस्थांनी दिनांक ३०.९.२०२१ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार त्यांना दिलेल्या उद्दिष्टानुसार धान खरेदी करावी तसेच सदर धान खरेदी कोणत्याही परिस्थीतीत १५ जुलै २०२२ रोजी पूर्ण करण्यात यावी असा निर्णय शासनाने अभिकर्ता संस्थांना दिले आहे.

आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने धान उत्पादक शेतक-यांना मोठा दिलासा मिळाला असून उन्हाळी हंगामातील धान खरेदीचे उद्दिष्ट वाढल्याने शेतक-यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. यासंदर्भात त्वरेने निर्णय घेतल्याबद्दल आ.  सुधीर मुनगंटीवार यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार व्यक्त केले आहे.

सुधारीत प्रत

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
मंत्रालय (विस्तार), दुसरा मजला, दालन क्र.२१९,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई- ४०० ०३२.

Email ID: - napu29.mhpds@gov.in दूरध्वनी क्र.०२२-२२०४५१६२

क्र:- धानभ-१२२१/प्र.क्र.१३८ भाग-२/नापु २९ दि:- ०३ जुलै, २०२२.

प्रति,

1) व्यवस्थापकीय संचालक, दि महाराष्ट्र राज्य को.ऑप. मार्केटिंग फेडरेशन मर्या., मुंबई.
2) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या., नाशिक.
3) NeML, प्रतिनिधी.

**विषय :** किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत पणन हंगाम २०२१-२२ (रब्बी) धान खरेदीबाबत.

**संदर्भ :** १. अनापु व ग्रासंवि, शासन निर्णय, क्र. धानभ-२६२०/प्र.क्र.१३८/नापु २९, दि.३०.०९.२०२१.
२. शासनाचे समक्रमांकाचे पत्र दि.०३.०६.२०२२.
३. केंद्र शासनाचे पत्र क्र.No.३ (३४)/२०२१-Py-१, दि.०२.०७.२०२२.

उपरोक्त विषयावरील संदर्भ क्र.२ येथील पत्रान्वये पणन हंगाम २०२१-२२ (रब्बी) मध्ये केंद्र शासनाने १.८५ LMT तांदुळ (In terms of paddy 2.76 LMT) खरेदीस दिलेल्या मंजूरीच्या अनुषंगाने मार्केटींग फेडरेशन यांना १.३४ LMT (In terms of paddy 1.99 LMT) आणि आदिवासी विकास महामंडळ यांना ०.५१ LMT (In terms of paddy 0.77 LMT) इतके तांदुळ खरेदीचे उद्दीष्ट नेमून देण्यात आले होते. नेमून दिलेले उद्दीष्ट दोन्ही अभिकर्ता संस्थांनी पूर्ण केले आहे.

२. आता केंद्र शासनाच्या संदर्भ क्र.३ येथील पत्रान्वये, केंद्र शासनाने एकूण ३.०२४ LMT तांदुळ (In terms of Paddy 4.51 LMT) खरेदीस मान्यता दिली आहे. सदर मंजूर उद्दीष्टापैकी उक्त हंगामासाठी यापूर्वी दिलेले १.८५ LMT तांदुळ खरेदीचे उद्दीष्ट वगळता उर्वरित १.१७४ LMT (In terms of Paddy 1.75 LMT) पैकी मार्केटींग फेडरेशन यांना ०.८२ LMT (In terms of Paddy 1.22 LMT) आणि आदिवासी विकास महामंडळ यांना ०.३५ LMT (In terms of Paddy 0.53 LMT) इतके तांदुळ खरेदीचे उद्दीष्ट नेमून देण्यात येत आहे.

३. अभिकर्ता संस्थांनी संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयातील तरतूदीनुसार व त्यांना दिलेल्या उद्दीष्टानुसार धान खरेदी करावी. सदर धान खरेदी ही **कोणत्याही परिस्थितीत दि.१५.०७.२०२२ पर्यंत** पूर्ण करण्यात यावी. अभिकर्ता संस्थांना विभागून दिलेले उद्दीष्ट हे ऑनलाईन नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांची संख्या लक्षात घेऊन त्याचे **तालुकानिहाय** वाटप करण्यात यावे व त्याची नोंद

Scanned by CamScanner

ऑनलाईन पोर्टलवर घेण्याकरिता NeML संस्थेस कळवावे. अभिकर्ता संस्थांनी त्यांना नेमून दिलेल्या उद्दीष्टांच्या मर्यादेतच आणि ऑनलाईन पोर्टलद्वारेच खरेदी करावी. कोणत्याही परिस्थितीत ऑफलाईन खरेदी ग्राह्य धरण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

४. NeML संस्थेस कळविण्यात येते की, रब्बी पणन हंगाम २०२१-२२ साठी अभिकर्ता संस्थांनी वरीलप्रमाणे विभागून दिलेल्या तालुकानिहाय धान खरेदीसाठीच्या मर्यादेबाबत ऑनलाईन पोर्टलवर नोंद घ्यावी.

५. किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत सर्वसामान्य शेतकऱ्यांना लाभ मिळण्याच्या दृष्टीने पणन हंगाम २०२१-२२ रब्बी साठी ऑनलाईन नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांचे शेड्युलींग करूनच धान खरेदी करण्याबाबत NeML यांनी आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात.

(चारूशीला तांबेकर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित :-

१) सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी.
२) कक्ष अधिकारी (नापु-२२/१६-अ/१६-ब), अनापु व ग्रासंवि, मंत्रालय, मुंबई.
३) निवडनस्ती (नापु-२९)

Scanned by CamScanner